| MHLA160006862025 | **नियमित दिवाणी दावा क्र.१७३/२०२५**<br>**नरसिंग व ईतर वि. कालिदास व ईतर** |
|---|---|

## नि.क्र.५ खालील आदेश

दिवाणी प्रक्रिया संहितेचा आदेश ३९ नियम १ व २ प्रमाणे तात्पुरता मनाई हुकूम मिळण्याकरिता अर्ज आहे.

२. **वादीची हकिकत थोडक्यात खालीलप्रमाणे** –

वादीचे वडील संभाजी बिरादार उर्फ बिराजदार यांच्या नावे मौजे धनेगाव ता. देवणी येथे ग्रामपंचायत मिळकत क्र.२८५ आहे. त्याचा नगर भूमापन क्र.२९१ आणि क्षेत्रफळ पूर्व–पश्चिम ५० फूट आणि दक्षिण–उत्तर ५९ फूट आहे. त्याच्या पूर्वेस – लिंबाजी सोमवंशी यांची जागा, पश्चिमेस – माणिक चरपल्ले यांची जागा, दक्षिणेस – ग्रामपंचायत रस्ता आणि उत्तरेस – प्रतिवादीची जागा आहे. यापुढे सदर मिळकतीस वाद मिळकत असे संबोधले.

३. वादीचे आजोबा शंकर बिरादार उर्फ बिराजदार यांनी वाद मिळकत विकत घेतलेली आहे. त्यांच्या मृत्यूनंतर वादीचे वडील संभाजी यांच्या नावे वाद मिळकत नोंदविली. वाद मिळकत मागील २ पिढ्यांपासून आणि वादीच्या मालकीची व कब्जे वहिवाटीत आहे. वादी त्याबाबत ग्रामपंचायत धनेगाव येथे कराचा भरणा करतो. प्रतिवादींनी वादींना राहण्यासाठी स्वतंत्र घर असल्याचा गैरफायदा घेऊन वाद मिळकतीमध्ये उत्तर बाजूने पूर्व–पश्चिम अतिक्रमण करून खोदकाम करण्याचा प्रयत्न केला आणि जागा त्यांची आहे असे म्हणून शिवीगाळ व जिवे मारण्याची धमकी दिली.

४. दि.२३/०५/२०२५ रोजी ग्रामपंचायत धनेगावचे सरपंच, ग्रामविकास अधिकारी आणि पंच यांनी वाद मिळकतीची मोजणी केली आणि हद्दी कायम केल्या. त्यांनी त्याअनुषंगाने पंचनामा तयार केला. प्रतिवादींनी त्यावर हरकत

नोंदविली आणि शिवीगाळ करून सदर जागेवर यायचे नाही असे म्हटले व हातपाय तोडतो, जिवे मारतो किंवा आत्महत्या करतो अशी धमकी दिली. वादींच्या पुतण्याने त्याबाबत पोलीस ठाण्यामध्ये लेखी अर्ज दिला.

५. प्रतिवादींच्या जमिनीमधून ओढा आहे. ते सदर ओढ्याचा नैसर्गिक प्रवाह नष्ट करून वादींच्या वाद मिळकतीमध्ये ओढा वळविण्याचा प्रयत्न करीत आहेत. त्याकरिता ते यशस्वी झाल्यास वादींचे अपरिमित नुकसान होईल. प्रतिवादी हे गुंड प्रवृत्तीचे असून वाद मिळकतीमध्ये अतिक्रमण करण्याचा प्रयत्न करून वादींच्या वहिवाटीस अडथळा करीत आहेत. त्यामुळे वादींनी कायम मनाईहुकूम मिळण्याकरिता दावा दाखल केला. वादींच्या बाजूने मनाईहुकूमाचे घटक स्थापित होतात. प्रतिवादींनी वादींच्या वाद मिळकतीवरील वहिवाटीस हरकत वजा अडथळा करू नये किंवा अतिक्रमण करू नये याबाबत तात्पुरता मनाईहुकूम मागितला.

६. प्रतिवादींनी लेखी जबाब आणि म्हणणे सादर करण्यास कसूर केल्याने त्यांच्याविरुध्द अर्ज विना म्हणणे पुढे चालविला.

७. मी उपलब्ध अभिलेख आणि युक्तिवाद याचे काळजीपूर्वक अवलोकन केले. त्यावरून माझ्या विचारार्थ खालील मुद्दे उपस्थित झालेत. मी त्यावर माझे निष्कर्ष कारणांसह खालीलप्रमाणे देत आहे –

| अनु.क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| ०१ | वादींना सकृद्दर्शनी प्रकरण आहे काय ? | होय. |
| ०२ | वादींच्या बाजूने न्यायाचा समतोल आहे काय ? | होय. |
| ०३ | तात्पुरता मनाईहुकूम नाकारल्यास वादींचे अपरिमित नुकसान होईल काय ? | होय. |
| ०४ | आदेश काय ? | अंतिम आदेशाप्रमाणे. |

## का र ण मी मां सा

८. वादींनी खालील कागदपत्रांवर भिस्त ठेवली.

| अ.क्र. | कागदपत्रांचे विवरण |
|---|---|
| १. | मालमत्ता पत्रक |
| २. | सनदेचा नमुना |
| ३. | नमुना ८ |
| ४. | पंचनामा |
| ५. | अदखलपात्र गुन्ह्याची पहिली खबर |
| ६. | संभाजी शंकर बिरादारचे मृत्यू प्रमाणपत्र |
| ७. | रुपावतीबाई संभाजी बिरादारचे मृत्यू प्रमाणपत्र |

**मुद्दा क्र. १ ते ३ बाबत –**

**९.** वरील तिन्ही मुद्दे एकमेकांशी निगडित असल्याने त्यांना एकाच वेळी चर्चेकरिता घेतले आहे.

**१०.** वादींचे अधिवक्ता श्री. एम.एस. नागराळे यांनी अर्जातील कथनाप्रमाणे युक्तिवाद केला आणि अर्ज मंजूर करण्याची विनंती केली.

**११.** प्रतिवादी आणि त्यांचे अधिवक्ता नियमित गैरहजर आहेत. त्यांनी सदर अर्जावर युक्तिवाद करण्यास कसूर केला. त्यांच्या युक्तिवादाशिवाय प्रकरण पुढे चालविले.

**१२.** मी उपलब्ध अभिलेख, कागदपत्रे आणि युक्तिवाद याचे काळजीपूर्वक अवलोकन केले. सदर अर्जाच्या निकालाच्या दृष्टीने वादींचा वाद मिळकतीवरील

हक्क आणि ताबा महत्वाचा आहे. वादींच्या कथनाला अनुसरून मालमत्ता पत्रक सनदेचा नमुना आणि नमुना ८ हे आहेत. त्यावरून संभाजी शंकर बिरादार यांच्या नावे वाद मिळकत असल्याचे स्पष्ट झाले. संभाजी हा दि.०१/१२/२०१८ रोजी मयत आहे. त्याकरिता मृत्यूचा दाखला दुजोरा देतो. त्यानंतर वादी हे त्याचे वारस म्हणून वाद मिळकतीचे धारक आहेत. प्रतिवादींना पुरेशी संधी आणि वेळ उपलब्ध असताना सुध्दा त्यांनी त्याविसंगत किंवा त्यांचा हक्क वजा अधिकाराबाबत म्हणणे सादर केलेले नाही. त्यांचा कसूर हा त्यांच्याविरुध्द परिस्थिती निर्माण करणारा आहे. सबब वादीच्या कथनावर आणि कागदपत्रांवर अविश्वास दाखविण्यासाठी कोणतेही कारण नाही.

**१३.** त्याचप्रमाणे पंचनामा दि.२३/०५/२०२५ हा नमूद मोजणीची स्थिती स्थापित करतो. त्याप्रमाणे मोजणी झाल्याचे निष्पन्न झाले. प्रतिवादींना सदर मोजणी मान्य नसण्याचे कारण त्यांनी पंचनाम्याच्या वेळी नमूद केलेले नाही किंवा दाव्यामध्ये हजर झाल्यानंतर सुध्दा त्यासंबंधाने म्हणणे दिलेले नाही. सबब प्रतिवादीचे आचरण हे स्वीकारण्याजोगे नाही. त्याचप्रमाणे प्रतिवादींनी वादींना वाद मिळकतीचा उपभोग घेण्यासाठी अडथळा केल्याचे सुध्दा निष्पन्न झाले. त्याकरिता अदखलपात्र गुन्ह्याची पहिली खबर अहवाल दुजोरा देतो.

**१४.** उपरोक्त चर्चेप्रमाणे, वादींचा वाद मिळकतीवर प्रथमदर्शनी हक्क स्थापित झाला. त्यावरून वादींच्या बाजूने प्रथमदर्शनी प्रकरण आहे. तुलनात्मक नुकसान किंवा आगळीक हे न्यायाचा समतोल याबाबत महत्त्वाचे घटक आहेत. प्रतिवादींनी वादींना वाद मिळकतीचा वापर करण्यास अटकाव व अडथळा केलेला आहे आणि अतिक्रमण करण्याचा प्रयत्न केला. त्याप्रमाणे न्यायाचा समतोल वादींच्या बाजूने स्थापित झाला.

**१५.** अपरिमित नुकसान आणि तुलनात्मक हानी हे तात्पुरता मनाईहुकूमाच्या अनुषंगाने महत्त्वाचे आहे. वादींना वाद मिळकतीचा वापर करण्यास अटकाव वजा अडथळ केल्यास निश्चितच त्यांचे अपरिमित नुकसान होईल व त्यांना सदर मिळकतीपासून वंचित रहावे लागले. सबब तात्पुरता मनाईहुकूम नाकारल्यास तुलनात्मक दृष्ट्या वादींना नुकसान होण्याची आणि त्यांच्या कायदेशीर

अधिकारावर गदा येण्याची शक्यता आहे. सबब वादींच्या बाजूने अपरिमित नुकसान स्थापित झाले.

**१६.** उपरोक्त चर्चेवरून मी या निष्कर्षापर्यंत पोहचलो की, वादींच्या बाजूने प्रथमदर्शनी प्रकरण, न्यायाचा समतोल आणि अपरिमित नुकसान इत्यादी घटक स्थापित झालेत. सबब मी विचारार्थ मुद्दा क्र.१ ते ३ यांना होकारार्थी उत्तर दिले.

**मुद्दा क्र.४ बाबत –**

**१७.** उपरोक्त चर्चेप्रमाणे वादींच्या बाजूने महत्त्वाचे घटक स्थापित झालेले आहेत. त्याविरुध्द सबळ स्थिती नाही. मनाईहुकूम नाकारण्यास कोणतेही कारण नाही. सबब, वादी हे तात्पुरता मनाईहुकूम मिळविण्यास पात्र आहेत. अर्ज मंजूर होण्यास पात्र आहे. मी विचारार्थ मुद्दा क्र.४ च्या उत्तरामध्ये खालील आदेश पारीत करतो.

**आदेश**

१. न्यायाच्या दृष्टीने अर्ज मंजूर केला.

२. प्रतिवादी क्र.१ व २ यांनी दावा निकाली लागेपर्यंत वादीच्या वाद मिळकतीवरील ताब्याला आणि वहिवाटीला अडथळा किंवा अटकाव करू नये असा तात्पुरता मनाईहुकूम देण्यात येतो.

३. आदेश संगणकावर टंकलिखित केला आणि खुल्या न्यायालयात घोषित केला.

Digitally signed by SHARAD AWADHUTRAO SURJUSE
Date: 2025.12.24 17:16:23 +0530

**ठिकाण – देवणी** **( श.अ. सुरजुसे )**
**दिनांक – २४/१२/२०२५** **दिवाणी न्यायाधीश क. स्तर,**
**देवणी.**

**<u>प्रमाणपत्र</u>**

हे खात्रीपूर्वक असे कथित करतो की, पि.डी.एफ. फाईलमधील न्यायनिर्णय हे मूळ न्यायनिर्णय प्रतीप्रमाणे तंतोतंत शब्दशः बरोबर आहे.

| | |
|---|---|
| लघुलेखकाचे नाव | श्री. मा.नि. येणगे |
| न्यायालयाचे नाव | श्री. श.अ. सुरजुसे,<br>दिवाणी न्यायाधीश क. स्तर, देवणी |